# अकादमीचा उद्यापासून दिल्लीत साहित्योत्सव

म. टा. विशेष प्रतिनिधी, नवी दिल्ली

साहित्य अकादमीतर्फे उद्या, शनिवारपासून सुरू होणारा साहित्योत्सव अनेक नवीन साहित्यिक उपक्रमांसह साजरा होणार आहे. यात कवितावाचन, साहित्य चर्चा, परिसंवाद आदी ४०० कार्यक्रमांमध्ये मराठीसह ६० भाषांतील ४००हून जास्त साहित्यिक सहभागी होणार आहेत. सहा दिवस चालणाऱ्या साहित्योत्सवात यंदा अकादमीला शनिवारी नवीन अध्यक्षही मिळणार आहेत. तृतीपंथी व एलजीबीटी समूहाच्या सदस्यांचा विशेष साहित्यिक कार्यक्रम, अखिल भारतीय कवी संमेलन, शिक्षण आणि सर्जनशीलता, साहित्य आणि महिला सक्षमीकरण आदी विषयांवर चर्चा, परिसंवाद होणार आहेत.

यंदाच्या साहित्योत्सवाचा प्रारंभ शनिवारी सकाळी साडेदहा वाजता अकादमीच्या वर्षभरातील प्रमुख उपक्रमांच्या प्रदर्शनाने होईल, असे साहित्य अकादमीचे सचिव के. श्रीनिवास राव यांनी सांगितले. सांस्कृतिक राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल यांच्या हस्ते त्याचे उद्‌घाटन होईल. साहित्य अकादमी सन्मान २०२२ वितरण सोहळा त्याच दिवशी होईल. मराठीसाठी प्रवीण दशरथ बांदेकर व कोकणीसाठी माया खरंगटे यांच्यासह २२ भाषांतील साहित्यिकांना अकादमी सन्मान दिला जाईल.

**मराठी नामांकितांचा सहभाग**

शरणकुमार लिंबाळे, मोहन आगाशे, अभिराम भडकमकर, नीरजा, प्रणव सखदेव, प्रतीक पुरी, दामोदर खडसे, श्रीधर नांदेडकर, प्रशांत बांगड, शेखर जोशी, हेमंत दिवटे, सचिन केतकर, ज्ञानेश्वर मुळे आदी.